महसूल व वन विभाग

विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय ( भूसुधार शाखा )

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१

दुरध्वनी क्र.०२५३-२४६२४०१ ते ४०५ / फॅक्स क्र.०२५३-२४५२१९४. (ई-मेल- divcomnashik@gmail.com)

**************************************************************

क्रमांक :- संकीर्ण /२०२१/ भूसूधार-०२/ प्र.क्र. २२९९७ / जा.क्र. १७०८५ दिनांक :- ०६ / ०८ /२०२१

**महत्वाचे**

**प्रति,**
**मा. जिल्हाधिकारी नाशिक / धुळे /नंदुरबार / जळगांव / अहमदनगर**
**( कुळकायदा शाखा )**

**विषय : - संगणकीकृत ७/१२ मधील इतर हक्कातील कालबाहय नोंदी कमी करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२०२१/ भूसुधार ०२/ प्र.क्र. २२९९७/ जा.क्र. १६०६७ दिनांक २३/०७/२०२१
२) या कार्यालयाचे समक्रमांक जा.क्र. १६३३९ दिनांक २८/०७/२०२१

उपरोक्त विषयांस अनुसरून, सातबारा उताऱ्यामधील इतर हक्कांत /इतर अधिकारांत प्रदिर्घ काळापासून तगाई बोजे , बंडीग बोजे , सावकारांची नांवे व बोजे, रद्द झालेल्या भुसंपादनाच्या नोंदी, आयटक बोजे , अस्तित्वात नसलेल्या संस्था अथवा सोसायटीचे बोजे इत्यादी नोंदी हया प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनांस आलेले आहे. हया नोंदीमुळे शेतकऱ्यांना जमीनीचे खरेदी विक्री व्यवहार अथवा कर्ज प्रकरणे ,भुसंपादन मोबदला इत्यादी कामकाजाच्यावेळी मोठया प्रमाणावर अडचण निर्माण होतात. या कालबाहय नोंदी शासनाचे विविध शासन निर्णय / परिपत्रके द्वारे यापुर्वी कमी करण्याच्या संदर्भिय पत्रानुसार आपणांस सुचना दिलेल्या आहेत. संदर्भिय पत्रांत दिलेल्या सुचनांनुसार काही कालबाहय नोंदी हया चौकशी व त्याअन्वये आदेशानुसार देखील कमी करता येऊ शकतात. या कालबाहय नोंदीचा व करावयाच्या कार्यवाहीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- तगाई कर्जाच्या नोंदी कमी करणे

  शासनाकडून शेती/ जमीन सुधारणासाठी विहीर , तगाई, बैलतगाई , चारा तगाई , खावटी तगाई, ऑईल इंजिन तगाई, घरबांधणे तगाई, जळीत तगाई, बि- बियाणे तगाई देण्यात आल्या होत्या. सदर विविध तगाईची परतफेड करण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना हप्ते ठरवून दिलेले होते. त्याची नोंद ७/१२ च्या इतर हक्कात वेळोवेळी घेण्यात आली होती. त्यापैकी काही शेतकऱ्यांनी कर्जाची फेड करून निर्बोजचा दाखला प्राप्त करून इतर हक्कातील बोजे कमी करून घेतले आहेत. तद्वतच शासनाने देखील वेळोवेळी तगाई कर्जे माफ केलेली आहेत. शासन निर्णय क्र. टीएजी -१०८८/ प्र.क्र. २२१४/ म-११ दिनांक ३१/१२/१९८८ अन्वये वर नमुद केलेले तगाई विषयक कर्ज माफ केलेली आहेत. मात्र त्या संबंधीचे इतर हक्कातील बोजे आजही काही प्रमाणांत शिल्लक असल्याचे ७/१२ उताऱ्यावर दिसून येते. तलाठी यांनी त्यांच्या सजेतील ७/१२

- बंडीग बोजे / आयकट बोजे

शासनने शेती सुधारणासाठी विशेष मोहीत हाती घेतली होती. त्यात शेतीला बांध घालणे, जमीन सपाटीकरण करून पावसाचे पाणी शेतातच जिरवणे व शेती अधिक उप्तादनक्षम बनविणे हा प्रामुख्याने उद्देश होता. त्या अनुषंगाने शासनाने महाराष्ट्रात सर्व जिल्हयात कृषि खात्याचे मृदसंधारण विभागाने ( बंडीग खाते ) प्रत्येक गटाच्या सिमांकनानुसार बांध घालण्याची कार्यवाही केली होती. त्या संबंधीचा येणारा खर्च शेतकऱ्यांकडून वसुलीसाठी सदरच्या रकमेचा बोजा संबधित शेतकऱ्यांच्या ७/१२ चा इतर हक्कात घेण्यात आलेला होता.सदर बोजाची रक्कम देखील महाराष्ट्र शासन कृषी व सहकार विभाग , ठराव क्रमांक मृदसा -१०७८ (७०७ ) १६- अे दिनांक २६/०३/१९७९ अन्वये शासनाने माफ केलेली असतांना आजही काही ७/१२ वर इतर हकांत बंडीग बोजे कायम असल्याचे दिसते. तसेच आयकट बोजेही शासनाने माफ केलेले आहेत. तलाठी यांनी त्यांच्या सजेतील ७/१२ उताऱ्यांवर अशा प्रकारचे बोजे असल्यांस त्या संबंधीची फेरफार नोंद स्वतःहून घेऊन बोजे कमी करण्याची कार्यवाही करावी.

- नजर गहाण / सावकारी कर्ज / सावकारी अवार्ड

पुर्वीच्या काळी बरेच शेतकरी सावकारांशिवाय इतर खाजगी व्यक्तींकडून हात उसनवारीने कर्ज रक्कम उचल करीत असे . सदर रक्कमेस तारण म्हणून बिना ताब्याने शेतजमिन गहाण ठेवून त्याबाबत नजर गहाण घेणार ( न.ग. घे.) अशा नोंदी / शेरे केले आहेत. तसेच काही ठिकाणी ७/१२ च्या इतर हक्कात नजर गहाण अशी देखील नोंद घेतली जात असे. सदर प्रकरणी या उसनवार रकमेची परतफेड केल्यानंतर नजर गहाण ठेवलेल्या शेतजमिनीच्या इतर हक्कातील नजर गहाणचा बोजा कमी होणे आवश्यक होते. परंतु सदरचे बोजे आजही काही ७/१२ वर कायम आहेत. तसेच सावकारी व्यवसाय करणारे सावकार त्यांच्या थकीत कर्जाच्या ॲवार्ड बोजाची नोंद / शेरा अशा कर्जदार शेतकऱ्यांच्या शेतजमिनीच्या ७/१२ च्या इतर हक्कांत घेणेकामी तत्कालीन सावकारी कायद्यातील तरतुदीनुसार जिल्हा न्यायालयात दावा दाखल करीत असे व जिल्हा न्यायालयातुन थकीत रकमेचा ॲवार्ड जाहिर करून बोजा ७/१२ च्या इतर हक्कात घेतला जात असे . सदर नजर गहाणच्या/ सावकारी कर्ज / अवार्ड नोंदी कमी करणेकामी तलाठी यांनी शेतकऱ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जासोबत उपलब्ध जुने ७/१२ उतारे उपलब्ध झाल्यास जुन्या फेरफार नोंदी तसेच रक्कम रूपये १००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र करून त्यात भविष्यांत नजर गहाणची रक्कम मिळणेबाबत संबंधित धनको अथवा त्यांचे वारस यांचेकडून मागणी आल्यास ती देण्याची जबाबदारी अर्जदारावर राहिल अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र घ्यावे. तदनंतर अशा नजर गहाण संबंधित शेरे / नोंदी कमी करण्यासाठी फेरफार नोंद घेवून बोजे कमी करण्याची कार्यवाही करावी.

तरी हया कालबाहय नोंदी वेळोवेळी निघालेल्या शासन निर्णयानुसार संगणकीकृत ७/१२ मधून फेरफार घेवून कमी करण्यात याव्यांत. यासाठी तालुका स्तरावर , मंडळ स्तरावर कॅम्प आयोजित करणेत यावेत. तसेच या चुका निष्काळजीपणामुळे पुनश्च केल्याचे निदर्शनांस आल्यांस संबधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपिल ) , १९७९ नुसार कारवाई करणेत येईल, या संदर्भाने आवश्यक त्या सुचना उपविभागीय अधिकारी , तहसिलदार यांना आपले स्तरावरून देण्यात याव्यात .

**स्थळ प्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे**

( गोरक्ष गाडीलकर )
**उपआयुक्त ( महसूल )**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**